**कंत्राटी वैद्यकीय अधिकारी, गट-अ**
**यांच्या मानधनात वाढ करणेबाबत .**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मवैअ- १०५४/प्र.क्र.२४१/भाग-२/सेवा-३**
गो. ते. रुग्णालय आवार, संकुल इमारत, १० वा माळा
मंत्रालय, मुंबई - ४०० ००१,
दिनांक: १३ जुन, २०१९

**वाचा -**सार्वजनिक आरोग्य विभाग ,शासन निर्णय क्र.मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१/सेवा-३,
दि०२.०३.२०१५. व दि२१.०४.२०१५.

**प्रस्तावना-**

सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि.०२.०३.२०१५ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय अधिकाऱ्यांना कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्याबाबत धोरण निश्चीत केले आहे. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे एमबीबीएस अर्हताधारक उमेदवार कमी मानधनावर नियुक्ती घेण्यास इच्छुक नसतात किंवा नियुक्ती घेवुन पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी जातात त्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त राहतात. वैद्यकीय अधिकारी नसले तरी, परिचारीका तंत्रज्ञ व इतर कर्मचाऱ्यावरील खर्च, इमारतीवरील खर्च, यंत्रसामग्रीवरील खर्च इत्यादी खर्च सुरुच राहतात. मात्र जनतेला आरोग्य सेवा मिळत नाहीत. कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना मंजूर केलेल मानधन कमी असल्याने कंत्राटी तत्वावर नियुक्ती स्विकारण्यास वैद्यकीय उमेदवरांना आकर्षीत करण्यासाठी विभागाच्या दि.०२.०३.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये कंत्राटी वैद्यकीय अधिकारी, गट-अ यांच्या निश्चित केलेल्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

१) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत कंत्राटी वैद्यकीय अधिकारी, गट-अ यांचे दि.०२.०३.२०१५ अन्वये मानधन निश्चीत करण्यात आले होते. आता सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्याचे मानधनात खालील प्रमाणे वाढ करण्यात येत आहे.

| अ.क्र. | वैद्यकीय अधिकारी | मानधन |
|---|---|---|
| १ | आदिवासी व दुर्गम भागात काम करणारे एम.बी.बी.एस वैद्यकीय अधिकारी | रु.६०,०००/- |
| २ | आदिवासी व दुर्गम भागात काम करणारे विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी | रु.७०,०००/- |
| ३ | एम.बी.बी.एस - वैद्यकीय अधिकारी (इतर भागात काम करणारे) | रु.५५,०००/- |
| ४ | विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी (इतर भागात काम करणारे) | रु.६५,०००/- |

२) सदर वाढीव मानधनासाठी येणारा खर्च २२१० ०१४६ (१०) कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातुन भागविण्यात यावा.

३) उपरोक्त कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना उपरोक्त वाचा येथिल सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, दि.०२.०३.२०१५ व २१.०४.२०१५ मधील नमूद अटी व शर्ती लागु राहतील.

४) सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र.६७/व्यय-१३ दि.११.०६.२०१९ अन्वये निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१३१७३१२२००१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2019.06.13 18:25:16 +05'30'

**(व. मुं. भरोसे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव

मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव

मा.मंत्री (सा.आ.वि.) यांचे खाजगी सचिव

मा.राज्यमंत्री (सा.आ.वि.) यांचे खाजगी सचिव
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग.
आयुक्त आरोग्य सेवा,आरोग्य भवन, मुंबई
विभागीय आयुक्त (महसुल) (सर्व)
संचालक आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
महालेखापाल - १/२ ( लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
कार्यासन व्यय-१३, वित्त विभाग
जिल्हाधिकारी (सर्व)
अधिष्टाता, वैद्यकीय महाविद्यालये, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
सह संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
उप संचालक, आरोग्य सेवा, (सर्व)
जिल्हा शल्यचिकित्सक (सर्व)
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
प्रधान सचिव (आरोग्य) यांचे स्वीय सहाय्यक
निवड नस्ती, सेवा-३